ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 8 | APRIL - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारताच्या जडणघडणीत स्त्री कामगारांचे योगदान



**Prof. Dr. Gangawane Balaji D.**
**(Professor&Head Dept. of History)**
**Mauli Mahavidyalay Wadala, North Solapur**

**सारांश :-**

जगातील बहुतेक सर्वच देशामध्ये स्त्रीयांचे स्थान हे दुय्यम असलेले दिसून येते रांधा वाढा, उष्टी काढा, या सारखे काम तिला करावे लागते. शेती असेल किंवा असंघटित क्षेत्रात काम करणा-या स्त्रीला दुय्यम स्वरुपाची भुमीका पार पाडावे लागते. पुरुषप्रधान समाजव्यवस्था व पितृसत्ताक कुटूंब पध्दतीचा हा परिणाम दिसून येतो. आज स्त्रीयांचे कार्यक्षेत्र हे व्यापक झाले आहे ती पुरुषांच्या बरोबरीने अर्थार्जन करित असली तरी कुटुबांची जबाबादारी सोडता येत नाही. आज दुहेरी भूमिका पार पाडतांना स्त्रीयांची तारांबळ होते.

**प्रस्तावना:**

भारतीय स्त्री ही अनादिकाळापासून प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर होती मात्र वैदिक काळामध्ये पुरुषप्रधान समाजव्यवस्थेला महत्व प्राप्त झाल्यामुळे स्त्रीयांनी ग्रहिणी म्हणून राहणे आधिक चांगले समजले जावू लागले त्यानंतर स्मृतीकाळ मध्ययुगीन काळ, ब्रिटिश काळ व स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत मजूरी करण्याचे काम हे कनिष्ठ वर्गातील स्त्रीया करीत होत्या. कारण मध्यम व उच्च वर्गातील स्त्रीयांनी घराबाहेर जावून कामे करणे हे निदर्जेचे मानले जात होते मात्र आज परिस्थीती बदलली आज सर्वच वर्गातील स्त्रीया हया संघटित आणि असंघटित क्षेत्रात कार्यरत असलेल्या दिसून येत आहे. शेतीच्या शोध लावण्यापसून ते अंतरळात जाण्यापर्यंत स्त्रीयांनी आपले योगदान दिले आहे .

**संशोधनाचा उद्देश :-**

संशोधनाचा उद्देश पुढील प्रमाणे

१) स्त्री कामगारांच्या व्यवसायाचा आढावा घेणे.

२) मिळालेल्या तथ्याच्या आधारे निष्कर्ष मांडणे .

## संशोधन पध्दती :-

संशोधन पेपर तयार करतांना दुय्यम साधनांचा वापर करुन विश्लेषणात्मक व ऐतिहासिक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

## गृहितके :-

प्राचीन काळापासून स्त्रीया विविध व्यवसायात कार्यरत आहेत. प्राचीन काळापासून स्त्रीया कमी अधिक प्रमाणात तीन टप्यामध्ये आपले कार्य पार पाडत आहे. १) गृहकार्य २) बालसंगोपन ३) इतर रोजगार या तीन्ही क्षेत्रात काम करतांना स्त्रीयांना तारेवरची कसरत करावी लागते. काम करणा-या स्त्रीयांचे ढोबळ मानाने तीनगट करत येतात.

खालील तीन्ही प्रकारामध्ये स्त्री कामगारांने आपले योगदान दिले आहे.

१) शेती व तत्सम कामात राबणा-या ग्रामीण स्त्रीया .

२) उदयोगधंदयात काम करणा-या स्त्रिया

३) नोकरी पेशा, सेवावृत्ती करणा-या स्त्रीया

एनएसएसओने उदयोगाचे ३८४ विभागात वर्गीकरण केले आहे त्यापैकी ३३ प्रकारच्या उदयोगामध्ये ४०% च्यावर स्त्री कामगार आहेत. ३३ उदयोगापैकी २३ उदयोगामध्ये ८०% व त्यापेक्षाही अधिक प्रमाणात स्त्री कामगार आहेत. ७ उदोगामध्ये ६०% ते ६९% स्त्री कामगार असून इतर उदयोगामध्ये ५० ते ५९% आणि १७ उदयोगामध्ये ४० ते ४९% स्त्री कामगार आहेत. एकूण कामगाराच्या ६०% स्त्री कामगार असलेले उदयोग म्हणजे पशुपालन आणि पशुसंर्धन, दुग्धोत्पादन, सुतगिरण्या, बिडीकामगार, भरतकाम, जरीकाम, दागिन्याची घडण, सुत कातणे, आगपेटया बनविणे, तंबाखुची उत्पादणे, फळावरी प्रक्रिया उदयोग इ. उदोगामध्ये स्त्री कामगार कार्यरत आहेत. स्त्रीयांच्या व्यावसायीक मागोवा पुढील मुदयाच्या आधारे होता येईल.

## शेती व्यवसायातील स्त्रीयांचा सहभाग :-

शेती आणि स्त्री यांच्यातील सहसंबंध हा प्राचीन काळापासून आहे शेतीचा क्रांतीकारी शोध लावून मानवाचे भटके जीवन स्थीर करण्याचे श्रेय हे स्त्रीयांनाच जाते. गाळपेराच्या शेतीपासून आधुनिक आवजारानी शेती करण्यात स्त्रीयांचा मोठा सहभाग आहे. २०११ च्या लिंगावर आधारित कामगार वर्गाच्या अहवालावरुन ५५.२१% स्त्री कामगार हया शेतमजूर आहे पुरुषाच्या बरोबरीत किंबहूना त्यापेक्षा जास्त प्रमाणात स्त्री या हया शेतात काम करतात. त्यांना मिळणारा मोबदला मात्र पुरुषाच्या तुलनेत कमी असलेला दिसून येतो केवळ स्त्री म्हणून तीच्या श्रमाकडे दुय्यमत्वाच्या दृष्टिने बघण्याची प्रथा ही पूर्वी होती आणि आजही आहे. शेतीमध्ये पेरणी, निंदणी, खुरपणी, कापणी करणे, मळणी करणे, खदय व्यवस्थीत ठेवणे इ. विविध स्वरुपाची कामे शेतामध्ये स्त्रीय करतात.

## कुटूंबाच्या कामामधील स्त्रीयांचा सहभाग :-

रकाम करणा-या स्त्रीया हया श्रम करित असल्या तरी यांचे श्रम हे अदृश्य स्वरुपाचे मानले जाते कुटुंबातील कामे हे समाजासाठी अदृश्य काम आहे. हे श्रम अनुउत्पादित गटामध्ये मोडत असल्याने याची दखल घेतली जात नाही. सकाळी सर्वात अगोदर उठणे, झाड-लोट करणे, सडा-सारवण, स्वयंपाक, धुनी भांडी,

बालसंगोपन, ही कामे दिवसभर करावी लागतात. ग्रामीण भागातील स्त्रीयांना सुविधेचा अभाव असल्यामुळे जळन आणणे, पाणी भरणे असेही कामे करावी लागतात .

एकोणीसाव्या शतकापर्यंत असंख्य स्त्रीया हया कौटूंबिक अनुत्पादीत श्रमामध्ये जीवन जगत होत्या. मात्र आज स्त्रीया या कामासाठी घराबाहेर जावून अर्थार्जन करतांना दिसून येतात. त्या दुहेरी भूमिका आज स्त्रिया पार पाडत आहे. त्यामुळे त्यांना अनेक संघर्षाला सामोरे जावे लागत आहे .

## उदयोगधंदयातील स्त्रीयांचा सहभाग :-

औद्योगिक क्रांती पूर्वी स्त्रीया हया पारंपारिक उदयोगामध्ये पुरुषाच्या बरोबरीने कार्यकरत होती . सुतकताई, विणकाम, भरतकाम नक्षीकाम, रंगकाम, कातडी उदयोग, तेल उदयोग, ताडगुळ उत्पादन, लाखउत्पादन मधुमक्षिका पालन, दोरा उदयोग, कुंभारकाम, लोकर उदयोग इ उदयोगामध्ये स्त्री या आपले योगदान देत असे. औद्योगीक क्रांती नंतर कारखानदारी पध्दतीचा जन्म झाला आणि पारंपारिक उदयोगाचे रुपांतर कारखाण्यात होवून स्त्रीयांना कामासाठी बाहेर पडावे लागले. ब्रिटिश कालखंडापासून कारखाना आणि खाणउदयोगात काम करणा-या स्त्रीयांचे प्रमाण वाढू लागले प्रामुख्याने कारखाण्यात किंवा खाणीत काम करणा-या स्त्रीया हया पूर्वी कनिष्ठ जातीतील असलेल्या आढूळ येतात मात्र आज कारखाण्यात किंवा खाणीत काम करणा-या स्त्रीया हया सर्वच जाती धर्माच्या असलेल्या दिसून येतात.

## व्यवसायिक क्षेत्रातील स्त्रीयांचा सहभाग :-

एकोणासाव्या शतकात स्त्रीशिक्षणाची चळवळ मोठया प्रमाणात सुरु झाली होती स्त्री शिक्षणामुळे स्त्रीयाचे कार्यक्षेत्र हे व्यापक बनले स्त्रीयांनी व्यवसायीक क्षेत्रामध्ये पाऊल टाकले याचे फलीत म्हणून आज शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर वकील, इंजिनिअर, नर्स, प्रशासकीय अधिकारी, संशोधन क्षेत्रातील योगदान अशा विविध क्षेत्रात स्त्रीया कार्यरत आहे आज स्त्री समाजकराण, राजकारण, असो किंवा अर्थकारण यामध्ये आपला ठसा उमटवित आहे आज बचत गटाच्या माध्यमातून स्त्रीयांना व्यवसायीक दृष्टया स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे कवेळ कर्तत्वच नाही तर स्त्रीया आज उत्तम नेतृत्वही करताना दिसून येतात.

## आर्थिक क्षेत्रातील स्त्रीयांचा सहभाग :-

स्त्रीयांचे आर्थिक अधिकार हे नाममात्र असले तरी स्त्रिया आर्थीक दृष्टया पूर्णपणे कुचकामी होत्या असे नाही शेतीचा शोध लावण्या पासून आज आंतराळात जाऊन संशोधन करण्याची उमंग स्त्रीयामध्ये दिसून येते. समाज परिवर्तनाच्या प्रत्येक टप्यामध्ये स्त्रीयांनी आपले आर्थीक योगदान दिले आहे . सामाजिक दुर्दैव म्हणावे लागतील की समाजान स्त्रीयांच्या श्रमाला किंमत दिली नाही. तीचे श्रम हे अनुत्पादक म्हणून कमी दर्जाचे मानले गेले ब्रिटिशांच्या आगमनानंतर पारंपारिक भारतीय अर्थव्यवस्थे मध्ये मोठया प्रमाणात परिवर्तन घडवून आले. या ठिकाणच्या शेती आणि उदयोगाच्या स्वरुपात परिवर्तन घडून आले त्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेत बदल घडून आल्याने स्त्रीयांच्या आर्थिक भुमिकेतही बदल घडून आला.

**कष्टकरी स्त्रीयांच्या व्यवसायीक आढावा घेतल्यानंतर निघालेले निष्कर्ष हे पुढील प्रमाणे.**

**निष्कर्ष :-**

१) प्राचीन काळापासून स्त्रीया हा विविध व्यवसायात कार्यरत आहे .
२) संघटित आणि असंघटीत क्षेत्रात स्त्रीया हया काम करतांना दिसून येतात.
३) असंघटिक क्षेत्रात काम करणा-या स्त्रीयांचे प्रमाण हे सर्वाधिक आहे.
४) कुटूंबातील अदृष्य स्वरुपाच्या कामाचा स्त्रीयांना कोणताही मोबदला मिळत नसल्यामुळे हे कार्य अनुत्पादित मानले जाते.
५) शेती शोधापासून ते आंतराळात जावून संशोधन करण्यापर्यंत वेगवेळया टप्यात स्त्रीयांनी आपले योगदान दिले आहे.
६) आजही समाजामध्ये लिंगभेदावर आधारित श्रमविभाजन दिसून येते.
७) समान कामासाठी समान वेतनाचा कायदा असला तरी असंघटित क्षेत्रात काम करणाज्या स्त्रीयांना याचा लाभ होत नाही .
८) चुल आणि मुल हे मर्यादित कार्याक्षेत्राच्या बाहेर जाऊन आज सर्व जातीधर्माच्या स्त्रीया विविध क्षेत्रात कार्यरत आहेत.
९) आज स्त्री पुरुषाच्या बरोबरीने अर्थार्जन करित असल्या तरी त्यांचे आर्थीक अधिकार मात्र नाममात्र दिसून येतात.

**शिफारशी :-**

वरिल निष्कर्षाच्या आधारी काही शिफारशी करण्यात आल्या त्या पुढील प्रमाणे –
१) असंघटित क्षेत्रात काम करणा-या स्त्रीयांना समान कामासाठी समान वेतन मिळावे.
२) स्त्रीयांच्या आदृश्य श्रमाला प्रतिष्ठा मिळावी.
३) स्त्री-पुरुष समानता निर्माण करणे.
४) स्त्रीयांच्या कुटूंबातील कामाला उत्पादीत कार्याचा दर्जा देणे .

**संदर्भ ग्रंथ :-**


१) समकालीन भारतातील नागरी स्त्रीया :- रहेना घडीयाली
२) स्त्री आणि पुरुष :- र.गे. विध्दांस
३) कामगार स्त्री :- सुशील फुले
४) ऐतिहासीक परिपेक्षातील स्त्रिया :- सुनिता बोर्डे - खडसे
५) महिला श्रमिक :- लॉरेन्स जास्मीन
६) भारतीय स्त्री जीवन :- साने गीता